Downloaded from SkillCouncils.com

ई- निवीदा सुचना क्र. 06/2024-25
महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय,नागपूर

---

महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालय नागपूर यांच्या वतीने स्तापित फॅब्रिकवर कलमकारी, HAND BLOCK, PIGMENT, स्क्रीन प्रिंटिंग करून हायटेक वुमेन गारमेंट क्लस्टर स्थापित करणे, प्रशिक्षण देऊन 200 महिलांना 10 वर्ष कालवधी करिता रोजगार देणाऱ्या प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याकरिता इच्छुक प्रशिक्षण संस्था यांचा कडून Expression of Interest (EOI) ची सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या https:/WWW.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किमंत | बयाना रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कोरी निवीदा किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Expression of Interest (EOI) | रु.65,38,000/- | रु.1,80,000/- | 120 दिवस | रु.18,000/- |

Expression of Interest पद्धतीचा तपशील

| | |
|---|---|
| EOI प्रसिद्ध | दिनांक 14/02/2025 |
| EOI दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ | दिनांक 14/02/2025 |
| EOI दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त | दिनांक 04/03/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| EOI दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दिनांक 14/02/2025 |
| EOI पूर्व मिटिंग दिनांक | दिनांक 21/02/2025 दुपारी 2.00 वाजता |
| EOI दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक 04/03/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| EOI प्रपत्र-फी , बयाना रक्कम ( EMD) Online द्वारे State Bank of India बँकेत जमा करणे. | दिनांक 14/02/2025पासून दिनांक 04/03/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत. |
| ऑनलाईन EOI उघडणे (तांत्रिक लिफाफा क्र. 1) | दिनांक 05/03/2025 |

महिला आर्थिक विकास महामंडळ, नागपूर द्वारा मा. जगदंबा शॉपिंग कॉम्पलेक्स "A" & "B" बिल्डींग पहिला माळा, कोराडी,जिल्हा- नागपूर येथे फॅब्रिकवर कलमकारी, HAND BLOCK, PIGMENT, स्क्रीन प्रिंटिंग करून हायटेक वुमेन गारमेंट क्लस्टर ची स्थापना करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्याकरिता प्रशिक्षण व क्लस्टर प्रकल्प अंमलबजावणी संस्थेची निवड करावयाची आहे. प्रशिक्षण व गारमेंट क्लस्टर अंमलबजावणी संस्थेने 117 दिवस (700 तास) कालावधीचे फॅब्रिकवर कलमकारी, HANDBLOCK, PIGMENT प्रिंटिंग व ॲडव्हान्स गारमेंट मेकिंग चे 200 महिलांना प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्याकरिता सदर प्रकल्पाअंतर्गत प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षण खर्च प्रति प्रशिक्षणार्थी रु.46.70 प्रति तास आर्थिक मंजुरात आहे. प्रशिक्षणानंतर महिलांना कोराडी येथे प्रशिक्षण केंद्रात रोजगार उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील व त्यांचे मानधन प्रति महिला 7000 ते 9000 प्रति महिना प्रशिक्षित महिलांना देणे आवश्यक आहे.

करिता पुढील 10 वर्ष कालावधी साठी रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या प्रशिक्षण संस्थेची निवड करावयाची आहे. प्रशिक्षण -प्रकल्प अंमलबजावणी संस्थेची निवड करण्याकरिता इच्छुक संस्थांकडून EOI (Expression Of Interest)

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Dowmloaded from SkillCouncils.com
मागविण्यात येत आहे. इच्छुक संस्थांनी आपल्या EOI Documents ची प्रत दिनांक 25/02/2025 पूर्वी सीलबंद लिफाफा मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ, नागपूर येथे कार्यालयीन वेळेमध्ये पोहचविणे बंधनकारक आहे. तसेच महाटेंडर पोर्टलवर सदर EOI चे document अपलोड करण्यात यावे.

प्रशिक्षण घेणाऱ्या संस्थेला 177 दिवस (700 तास) खाली दिलेल्या नमूद तक्त्यानुसार प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

| Sr. No. | Category | Module | Description |
|---|---|---|---|
| 1 | Basic Training | 1 | Induction, Introduction to Hand block -Kalmkari Block Printing, Apparel & Textile Industry, Dexterity & Colour Blindness test |
| | | 2 | Basic of various machinery, tools and its function |
| | | 3 | Basic Training and Exercises |
| 2 | Production Training | 1 | Operation Specific Training to produce Printed Fabric & Garment |
| 3 | Skill Upgradation Training | 1 | Reworks reduction and Quality improvement |
| | | 2 | Capacity increase and stamina building training |
| 4 | Soft Skill training | 1 | Training in emerging skills-5S and other lean tools |
| | | 2 | Soft skill training |
| 5 | Screening & Placements | 1 | Evaluation & Assessment |

**सदर EOI च्या अटी व शर्ती खालील प्रमाणे..........**

1. प्रशिक्षण संस्था ही शासकीय नियमाप्रमाणे नोंदणीकृत असावी. त्याबाबतचे MSME किंवा दुसरे उपलब्ध असलेले सर्टिफिकेट जोडण्यात यावे.

2. प्रशिक्षण संस्थेला 200 प्रशिक्षणार्थींना ॲडव्हान्स गारमेंट मेकिंग चे प्रशिक्षण दिल्याचा अनुभव असावा. त्याबाबतची शासनाकडून प्राप्त झालेल्या वर्क ऑर्डरची प्रत जोडण्यात यावी. अश्या संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.

3. प्रशिक्षण संस्थेने ह्यापूर्वी प्रशिक्षण देऊन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना त्याच जागेवर 2 वर्ष कालावधी करिता रोजगार उपलब्ध करून देण्याचा अनुभव असणा-या संस्थेला प्राधान्य देण्यात येईल. त्याबाबतची माहिती व फोटोग्राफ जोडण्यात यावे.

4. प्रशिक्षण संस्थेकडे फॅब्रिकवर कलमकारी, Hand Block, Pigment प्रिंटिंग चे प्रशिक्षण देणारे प्रशिक्षित व अनुभवी स्टाफ असणे आवश्यक आहे. अशा 4 Staff चा बायोडाटा व त्यांचे संमती पत्र जोडण्यात यावे.

5. फॅब्रिकवर पिगमेंट प्रिंटिंग करण्याच्या दृष्टीने Sustainable Pigment Printer चालविण्याचा 5 वर्ष कालावधीचा अनुभव असणारा 2 तज्ञ प्रशिक्षकांचा बायोडाटा व त्यांचे संमती पत्र जोडण्यात यावे.

6. कलमकारी - हँड ब्लॉक - पिगमेंट प्रिंटिंग करणे हेतू प्रति महिना आवश्यक फॅब्रिक 60000 मीटर उपलब्ध करून देण्याबाबतचे हमीपत्र सादर करण्यात यावे. सदर फॅब्रीक संस्थेला स्वखर्चाने उपलब्ध करून द्यावे लागेल.

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Dowmloaded from SkillCouncils.com

7. Expression of Interest धारक कोणत्याही शासकीय/निम शासकीय/खाजगी संस्थेच्या काळे यादीत मध्ये समविष्ट नसल्याचे तसेच निविदे सोबत जोडलेले सर्व कागद पत्रे/प्रमाणपत्रे खरी असल्या बाबत चे निविदे सह रु 100 चे Stamp Paper वर सत्य प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.,तसेच बँकेचे थकीत नसल्याबाबत चे हमीपत्र रु.100 किमतीच्या स्टॅम्प सादर करावे, रु 100 किमतीच्या स्टॅम्प पेपर वर सदर निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्या बाबत लिफाफा क्रं.१ मध्ये सादर करावे लागेल. निवीदा फॉर्म फीस ई-पावती, बयाना रक्कम ई-पावती सोबत जोडावी.

8. नोंदणी प्रमाणपत्र,PAN Card, GST प्रमाणपत्र, IT Return 3 वर्षाचे असावे तसेच अंकेषण अहवाल (Audit Report) मागील 6 वर्षा दरम्यान कोणत्याही 3 वर्षाची वार्षिक उलाढाल ही 30 लक्ष रुपये यापेक्षा जास्त असावी. त्याबाबतचे आयटी रिटर्न प्रमाणपत्र व बॅलन्स सीट जोडण्यात यावी.

9. कलमकारी -हॅन्ड ब्लॉक - पिगमेंट प्रिंटिंग व गारमेंट क्लस्टर प्रकल्प द्वारे निर्मित Finish Garment Goods ला मार्केट उपलब्ध होण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या FACTORY OUTLET - FASHION MALL बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल जोडण्यात यावा. FACTORY OUTLET-FASHION MALL स्थापित करण्यात येणाऱ्या जागेची माहिती, सदर जागेचा 3 वर्ष कालावधी चा भाडेकरार जोडण्यात यावा. FACTORY OUTLET - FASHION MALL संस्थेला स्वखर्चाने उभारणे बंधनकारक राहील.

10. गारमेंट क्लस्टर द्वारा निर्मित मालाचा पुरवठा राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये करणे दृष्टीने प्रशिक्षण अंमलबजावणी संस्थेचा 2 कंपन्यांसोबत Buy-Back किंवा Garment Job Work बाबतचा व्यावसायिक सामंजस्य करार (MOU) असणे बंधनकारक आहे. सदर सामंजस्य कराराची प्रत जोडण्यात यावी.

11. 200 महिलांना 177 दिवस, 700 तास कालावधीचे कलमकारी-हँड ब्लॉक- पिगमेंट प्रिंटिंग - Advance गारमेंट मेकिंग प्रशिक्षणाचा सविस्तर Course contents, course modules, Sewing Machine Operator Training Manual यांची प्रत सादर करण्यात यावी.

12. 700 तासाचे प्रशिक्षण देणे करीता प्रशिक्षण संस्थेला 46.70 रुपये प्रति तास प्रति प्रशिक्षणार्थी एवढे मानधन देण्यात येईल. कोणत्याही प्रकारचा अॅडव्हान्स-अग्रीम रक्कम प्रशिक्षण संस्थेला देण्यात येणार नाही.

13. प्रशिक्षण राबविण्याकरिता 20 प्रशिक्षणार्थी मागे एक प्रशिक्षक याप्रमाणे 10 प्रशिक्षकांची नेमणूक करणे बंधनकारक आहे. कलमकारी - हँड ब्लॉक प्रिंटिंग - Advance गारमेंट मेकिंग चे यशस्वीरित्या प्रशिक्षण देण्याकरिता 10 अनुभवी प्रशिक्षकांचा बायोडाटा व त्यांचे संमती पत्र सादर करावे.

14. प्रशिक्षण झाल्यानंतर प्रकल्पाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याकरिता खालील Staff ची नेमणूक करणे बंधनकारक आहे.........

a) प्रोडक्शन मॅनेजर-1 ज्याला गारमेंट उत्पादन क्षेत्रामध्ये कमीत कमी 10 वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Dowmloaded from SkillCouncils.com

b) पदवीधर व अनुभवी फॅशन डिझायनर - 5 जे मार्केट Trend नुसार गारमेंट डिझाईन, पॅटर्न मेकिंग व इतर संबंधित कामे उत्तमरीत्या करू शकतील.

c) पदवीधर व उत्कृष्ट दर्जाचे अनुभवी ग्राफिक डिझायनर - 5 जे कलमकारी - Hand Block प्रिंटिंग, पिगमेंट प्रिंटिंग फॅब्रिकवर मार्केट Trend नुसार डिझाईन करून फॅब्रिक प्रिंट करू शकेल.

d) अनुभवी Sustainable Pigment Printer Operator- 2 जे पिगमेंट प्रिंटरचे ऑपरेशन व्यवस्थित करून फॅब्रिक प्रिंट करू शकेल.

वरील सर्व स्टाफ चा बायोडाटा, त्यांचे संमती पत्र सोबत जोडावेत.

15. कलमकारी - हँड ब्लॉक - पिगमेंट प्रिंटिंग - गारमेंट मेकिंग प्रशिक्षण व अंमलबजावणी संस्थेची निवड करण्याकरिता निवड कमिटीची मीटिंग महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय, बुटीबोरी जिल्हा नागपूर येथे ठेवण्यात येईल. पात्र संस्थांना कलमकारी - हँड ब्लॉक - पिगमेंट प्रिंटिंग- गारमेंट मेकिंग चा प्रकल्प यशस्वीरीत्या राबवण्याच्या दृष्टीने Presentation देणे आवश्यक आहे. त्याकरिता पात्र संस्थाना पत्रा द्वारे दिनांक व वेळ कळविण्यात येईल. पात्र संस्थांना सदर प्रकल्प राबवण्याबाबतचा Research and Planning Report निवड समिती समोर ठेवणे बंधनकारक आहे. सदर रिपोर्ट मध्ये 10 वर्ष कालावधी करिता प्रकल्प कशाप्रकारे राबविण्यात येईल याची रूपरेषा सादर करण्यात यावी.

16. कलमकारी- हँड ब्लॉक - पिगमेंट प्रिंटिंग - गारमेंट मेकिंग प्रशिक्षण - उत्पादन घेण्यास लागणारा आवश्यक सर्व खर्च निवड करण्यात आलेल्या संस्थेस स्वतः करावा लागेल. त्याबाबतचा महिला आर्थिक विकास महामंडळ नागपूर संबंधित संस्थेसोबत सामंजस्य करार (MOU) करेल. सामंजस्य करारामधील नमूद अटी व शर्तीचे पालन करणे निवड .

झालेल्या संस्थेस बंधनकारक राहील.

17. प्रशिक्षण संस्थेला कोणताही अग्रिम दिला जाणार नाही.

18. प्रत्येक महिन्यानंतर माविम जिल्हा कार्यालयाद्वारे प्रगती तपासून प्रशिक्षण संस्था चे प्रशिक्षण फी अदा केले जाईल.

19. प्रशिक्षण संस्थेला द्यावयाचे एकूण रक्कम पैकी 10% रक्कम हि प्रशिक्षण पूर्ण होऊन रोजगार सुरु झाल्यानंतर अदा केली जाईल.

20. प्रति महिला प्रति दिवस 150 रु. विद्यावेतन हे 4 महिन्याच्या प्रशिक्षण कालावधीत महिला आर्थिक विकास महामंडळ व्दारे प्रशिक्षणार्थी च्या खात्यावर दर महिन्याला जमा करण्यात येईल त्याचा प्रशिक्षण संस्थेचा काही संबंध राहणार नाही. प्रशिक्षणार्थी हजेरी दरमहा संबंधित संस्थेला महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालयास सादर करावे लागेल. त्यानुसार प्रशिक्षनार्थींना विद्यावेतन अदा करण्यात येईल.

21. EOI भरण्यापूर्वी संबंधित संस्थेने प्रशिक्षण स्थळी प्रत्यक्षात भेट देऊन प्रशिक्षण हॉल व मशिनरी ची पाहणी करावी तसेच त्याचे GPS फोटोग्राफ व प्रशिक्षण स्थळी भेट दिल्याचा अहवाल आस्था लोकसंचालित साधन केंद्र, नागपूर ग्रामीण येथील व्यवस्थापक यांच्या सहीनिशी सोबत जोडणे बंधनकारक राहील.

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Dowmloaded from SkillCouncils.com

(करुणा कनोजे/मनघटे, व्यवस्थापक, आस्था लोकसंचालित साधन केंद्र, नागपूर ग्रामीण, भ्रमणध्वनी क्र. 9850703810, 9284378838)

22. प्रशिक्षण संस्थेला जिल्हा स्तरीय निवड समितीच्या समोर संस्थेचे सर्व संबंधित मूळ दस्ताऐवज सादर करावे लागेल.

23. सादरीकरण व मूळ दस्ताऐवज तपासणी नंतर जिल्हा स्तरीय निवड समितीद्वारे अंतिम निर्णय घेण्यात येईल.

24. प्राप्त EOI मंजूर /नामंजूर करण्याचे सर्व अधिकार जिल्हास्तरीय निवड समितीकडे राहील

25. प्रशिक्षण संस्था जिल्हा स्तरीय निवड समितीच्या समोर सादरीकरण करेल . त्यानंतर निवड समिती प्रशिक्षण संस्थाला गुण देईल. व पात्र संस्थेची गारमेंट युनिट चे प्रशिक्षण चालविण्याकरिता निवड करेल.

26. जर प्रशिक्षण समाधानकारक नसल्यास प्रशिक्षण रद्द करण्याचा अधिकार महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालयाला राहील व कोणतेही प्रशिक्षण फी दिले जाणार नाही.

27. प्रशिक्षण संस्थाद्वारे महिलांचा अपघात विमा काढावा लागेल.

28. प्रशिक्षणाच्या वेळी हॉल मध्ये प्रशिक्षनार्थीना काही अपघात झाल्यावर त्याची भरपाई प्रशिक्षण संस्थाला करावी लागेल.

29. प्रशिक्षण दरम्यान प्रशिक्षणार्थी ची दररोजची हजेरी करिता थंब मशीन प्रशिक्षण स्थळी असणे आवश्यक आहे.

30. सदर प्रकल्पाचे मुल्यांकन हे शासन मान्यता प्राप्त संस्थेमार्फत करण्यात येईल. मुल्यांकन करिता येणारा खर्च प्रशिक्षण संस्थेला करावे लागेल.

31. प्रशिक्षण संस्थेला 177 दिवस (700 तासांचे) प्रशिक्षण झाल्यानंतर महिलांना नियमित रोजगार द्यावा लागेल.

32. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगार निर्मिती व वापरण्यात येणा-या मशिनरी संसाधने इ.बाबतचा सांमजस्य करार प्रशिक्षणादरम्यान स्वतंत्ररीत्या संस्थे सोबत करण्यात येईल.त्यात नमूद केलेल्या अटी शर्ती संस्थेला मान्य करणे बंधनकारक राहील.

33. Pre bid Meeting दिनांक 21/02/2025 रोजी महिला आर्थिक विकास महामंडळ, कार्यालय, C/o. माविम महिला प्रांगण, प्लॉट नं.पी-62 आर & सी. झोन, एम.आय.डी.सी.इंडस्ट्रीयल एरिया बुटीबोरी-441122 येथे सकाळी 11.30 वाजता राहील.

दिनांक :-14/02/2025

वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी
महिला आर्थिक विकास महामंडळ,
जिल्हा कार्यालय , नागपूर

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com